**<u>शपथेवर जादा सरतपास सुरु–</u>**
**<u>वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. बी. कोलगांवकर यांचेमार्फत–</u>**

मी प्रस्तुत कामी प्रतिवादीला दावा पूर्व नोटीस पाठविलेली आहे. त्याची स्थळप्रत मी प्रस्तुत कामी दाखल केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. आता मला नि.४/२ वरील नोटीसची स्थळप्रत दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी व माझ्या विधिज्ञांची सही आहे. माझ्या विधिज्ञांची सही ओळखण्याचे कारण म्हणजे त्यांनी माझ्या समक्ष सही केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.१५** देण्यात येते. सदरची नोटीस पोहोच झालेबाबतची पावती मी प्रस्तुतकामी दाखल केलेली आहे. आता मला नि.४/३ सोबतची पावती दाखविण्यात आली. ती तीच आहे. (public document hence, exhibited) त्यास **नि.१६** देण्यात आली. प्रतिवादी व माझेत साठेकरार झालेला होता. त्या साठेकराराची प्रत मी प्रस्तुत कामी दाखल केलेली आहे. ती मला दाखविल्यास मी ती ओळखू शकतो. आता मला नि.१७/१ कडील साठेकराराची प्रत दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी व प्रतिवादी यांची सही आहे. (सदरचा दस्त हा नोटराईज्ड् दस्त असल्याने त्याची विधीग्राह्यता बाबतचा मुद्दा असल्याने सदर दस्तास निशाणी देण्यात येत नाही.)

जादा सरतपास पूर्ण.

प्रतिवादी व तर्फे विधिज्ञ पुकारता गैरहजर.

सबब उलटतपासाकरीता तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,
KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.07.11 18:08:36 +0530
(श्रीमती आर.जी.कुंभार)

दि. ११/०७/२०२४

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.